


# पारनेर दर्शन





वर्ष १ अंक ३२९, मंगळवार २४ सप्टेंबर २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये


# सुजित पाटील शरद पवारांच्या भेटीला!

■ खा. नीलेश लंके, सुजित पाटील एकाच दिवशी बारामतीत
■ तालुक्याच्या राजकीय वर्तुळात खळबळ

पारनेर : विशेष प्रतिनिधी

**लवकरच होऊ घातलेल्या विधानसभा निवडणूकांच्या पार्श्वभुमीवर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी बारामती येथे गोविंद बागेत जात शरद पवार यांची भेट घेत उमेदवारीची मागणी केली. दरम्यान, योगायोगाने शनिवारच्या या भेटीदरम्यान खा. नीलेश लंके हे देखील गोविंद बागेत होते. भाजपा सोबत असलेल्या सुजित पाटील यांनी शरद पवार यांची भेट घेतल्याने तालुक्याच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.**

पारनेर दर्शन Special

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून खा. नीलेश लंके यांच्या पत्नी राणीताई नीलेश लंके यांची उमेदवारी निश्‍चित मानली जाते. किंबहूना नीलेश लंके यांनी लोकसभेची निवडणूक लढवावी, त्यांच्या रिक्त झालेल्या जागेवर त्यांच्या पत्नी राणीताई लंके यांना विधानसभेची उमेदवारी पक्षातर्फे दिली जाईल असा शब्द खुद्द शरद पवार यांनी नीलेश लंके यांना दिला आहे.शिवाय महाविकास आघाडी सरकार सत्तेवर आल्यानंतर राणीताई यांना मंत्रीपदाचीही संधी देण्याची ग्वाही मोठया पवारांनी दिली आहे. त्यामुळे एकीकडे नीलेश लंके यांनी पारनेर-नगर मतदारसंघासह नगर जिल्हयातील सर्वच विधानसभा मतदारसंघात विधानसभा निवडणूकांसाठी जोरदार मोर्चेबांधणी सुरू केलेली असतानाच सुजित पाटील यांनी शरद पवारांची भेट घेतल्याने तालुक्याच्या राजकारणात खळबळ उडाली आहे.



## ठाणगे यांचे कानावर हात

आपले कार्यकर्ते आपल्या उमेदवारीसाठी पवार साहेबांना शनिवारी भेटल्याचे सुजित पाटलांनी मान्य केलेले असताना पाटलांचे खंदे कार्यकर्ते अरूण ठाणगे यांच्याशी संपर्क करून विचारणा केली असता त्यांनी कानावर हात ठेवले. मी बारामतीला गेलोच नव्हतो, पारनेरमध्ये होतो असे सांगत त्यांनी भेटीचा तपशील देणे टाळले.

## लंके यांनी खडे बोल सुनावले !

गोविंद बागेच्या प्रवेशद्वाराजवळ सुजित पाटील यांचे कार्यकर्ते अरूण ठाणगे, राधुजी ठाणगे, सतिश पिंपरकर आदी कार्यकर्त्यांची व खा. नीलेश लंके यांचीं समोरासमोर भेट झाली. त्यावेळी लंके यांनी त्यांना खडे बोल सुनावले. लोकसभा निवडणूकीत विरोधात काम करता आणि आता पवार साहेबांच्या भेटीला येता हे अशोभनिय आहे. निवडणूकीच्या तोंडावर तुमचे प्रेम उतू आले का असा सवाल लंके यांनी त्या कार्यकर्त्यांना केल्यानंतर ते निरूत्तर झाले. दरम्यान, लंके व झावरे समर्थकांची भेट झाली त्यावेळी सुजित झावरे हे त्यांच्या वाहनामध्येच होते अशी माहीती लंके यांच्या समवेत असलेल्या कार्यकर्त्यांनी सांगितले.

## एका घरात दोन पदे नाही

यासंदर्भात बोलताना सुजित पाटील यांनी सांगितले की, शरद पवार यांनी आपल्या कार्यकर्त्यांना भेटीसाठी दहा मिनिटांची वेळ दिली होती. या भेटीदरम्यान कार्यकर्त्यांनी आपल्यासाठी उमेदवारीची मागणी केली. शरद पवार यांनी आपल्याला उमेदवारीचा शब्द दिला नसला तरी राणीताई लंके यांना उमेदवारी देणार नसल्याचे शरद पवार यांनी सांगितल्याचे ते म्हणाले. एका घरात मी दोन पदे देणार नाही असेही पवारांनी सांगितल्याचे सांगतानाच नीलेश लंके यांनी खासदारकीच्या राजीनाम्याचा ड्रामा केला तरी शरद पवार लंके यांच्या घरात उमेदवारी देणार नसल्याचा दावा सुजित पाटील यांनी केला.

## मी नव्हे, कार्यकर्ते भेटले

या भेटीसंदर्भात सुजित पाटलांशी संपर्क साधला असता त्यांनी या भेटीचा इन्कार केला. माझ्या प्रेमाखातर आपले कार्यकर्ते पवार साहेबांना भेटल्याचे पाटलांनी मान्य केले.

## लंके परतल्यानंतर पाटलांची भेट

शरद पवार यांनी खा. नीलेश लंके प्रतिष्ठानला एक कोटी रूपयांच्या फिरत्या दवाखान्याची भेट दिली असून त्याचे लोकार्पण पुर्वनियोजित कार्यक्रमानुसार शनिवारी पवारांच्या हस्ते करण्यात येणार होते. या कार्यक्रमासाठी लंके व त्यांचे सहकारी बारामतीमध्ये दाखल झाले होते. त्याच वेळी सुजित पाटील व त्यांचे सहकारीही तिथे आल्याने झावरे समर्थकांची चांगलीच कुचंबना झाली. अखेर लंके यांच्या फिरत्या दवाखान्याचे लोकार्पण झाल्यानंतर सुजित पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांची शरद पवार यांच्याशी भेट झाल्याची माहीती आहे. या भेटीचा तपशील मात्र कळू शकला नाही.

# लंके प्रतिष्ठानच्या वतीने कृषि प्रदर्शनाचे आयोजन

१७ ऑक्टोबरला शुभारंभ, २० ऑक्टोबरला समारोप




■ नीलेश लंके पतिष्ठानच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कृषि प्रदर्शनासंदर्भात खा. नीलेश लंके यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या पत्रकार परिषदेत माहीती देण्यात आली.

पारनेर : प्रतिनिधी

**राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार ) पारनेर नगर आणि श्री नीलेश लंके प्रतिष्ठणच्या वतीने सालाबादप्रमाणे यंदाही पारनेर शहरात कृषि प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आले असून दि. १७ ऑक्टोबर रोजी त्याचा शुभारंभ होऊन २० ऑक्टोबर रोजी समारोप होणार असल्याची माहिती प्रतिष्ठाणचे प्रदेशाध्यक्ष सुदाम पवार, जिल्हाध्यक्ष कारभारी पोटघन, तालुकाध्यक्ष बाळासाहेब खिलारी, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष बाबाजी तरटे यांनी दिली.**

खासदार नीलेश लंके व जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या राणीताई लंके यांच्या संकल्पनेतून मतदारसंघातील शेतकऱ्यांना शेतीमधील नव-नवीन तंत्रज्ञान अवगत व्हावे या हेतूने गेल्या काही वर्षांपासून कृषि प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येते. आजवर पार पडलेल्या प्रदर्शनांना लाखों शेतकरी बांधव तसेच सामान्य नागरीकांनी भेटी देत प्रदर्शनामधील विविध वस्तू तसेच शेतीमधील तंत्रज्ञानाचा लाभ घेतलेला आहे.

गतवर्षी पार पडलेल्या प्रदर्शनामध्ये राज्यभरातील १२६ नव-नवीन कंपन्यांनी हजेरी लावली होती. मतदारसंघातीलच नव्हे तर नगर-पुणे जिल्हयातील नागरीकांनी या प्रदर्शनास भेट देऊन खा. लंके यांनी ही संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल समाधान व्यक्त केले होते. मधुमक्षीका पालन, गोमातेच्या शेणापासून सुगंधी उत्पादने, कमी खर्चात घरीच तयार करता येणारे गांडूळ खत, कमी खर्चात १०० टन उस उत्पादनाचे तंत्र, विहीरींसाठी शासकीय अनुदानातून सोलर पंप, शेत तळे, विहीर, ठिबक सिंचन, पॉली हाउससाठी शासकीय अनुदान, महिलांसाठी घरबसल्या अगरबत्ती, कापूर, समई वात, फुलवात तयार करणे, तरूणांसाठी कमी भांडवलामध्ये सुरू करावयाच्या व्यवसायाची माहीती, राष्ट्रीयकृत बँकांचे अर्थसहाय्याबाबत मार्गदर्शन, दुध उत्पादनात वाढ होण्यासाठी नामांकित कंपन्यांचे पशुखाद्य आदींचा या प्रदर्शनात समावेश असणार आहे.

पारनेर शहरातील ग्रामीण रूग्णालयालगत आयोजित करण्यात आलेली या सर्व समावेशक, राज्यातील ग्रामीण भागातील सर्वात मोठया व आदर्श प्रदर्शनाचा शेतकरी बांधव, महिला, लहान मुलांनी लाभ घेण्याचे आवाहन नीलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

## एक कोटींची बैलजोडी, खाऊ गल्ली आणि बरेच काही !

एक कोटी रूपयांची देशातील डबल हिंद केसरी सोन्या, मोन्याची बैलजोडी ही या प्रदर्शनाचे आकर्षण असणार आहे. खवय्यांसाठी कोल्हापुरचा तांबडा व पांढरा रस्सा, कोल्हापुरी मिसळ, कोल्हापुरी भेळ,कर्जतची शिपी आमटी, लहान मुलांसाठी किडस् झोन आदींची रेलचेल या प्रदर्शनात असणार आहे.

राणीताई लंके.
मा. जिल्हा परिषद सदस्या

## शेतकरी, उद्योजकांचा सत्कार

तालुक्यातील प्रगतीशिल शेतकरी, नवे यशस्वी उद्योजक बांधव यांचा यावेळी सत्कार करण्यात येऊन त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी या प्रदर्शनात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. नीलेश लंके प्रतिष्ठान आणि एस व्ही कृषि नेचर पुणे यांच्या मार्फत या सन्मान सोहळयासाठी योगदान देण्यात येणार आहे.

सुवर्णा धाडगे. पूनम मुंगसे

# राळेगणसिध्दीत दोन दिवशीय राष्ट्रीय शिबिर

■ लोक आंदोलन न्यासचा पुढाकार
■ कल्पना इनामदार यांची माहिती

राळेगणसिध्दी : प्रतिनिधी

**लोक आंदोलन न्यास या संस्थेच्या वतीने दि. २७ व २८ सप्टेंबर दरम्यान राळेगणसिध्दीत दोन दिवशीय राष्ट्रीय शिबिराचे आयोजन करण्यात आलयची माहीती लोक आंदोलन न्यासच्या कार्याध्यक्षा कल्पना इनामदार यांनी दिली.**

दि.२७ सप्टेंबर रोजी राळेगणसिध्दी येथे सुरू करण्यात येणाऱ्या लोक आंदोलन न्यासच्या कार्यालयाचे उद्घाटन ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या हस्ते होणार आहे.

या शिबिरामध्ये ग्रामविकास, पर्यावरण, ग्रामसभांना जादा अधिकार, पाणलोट क्षेत्र विकास, माहितीचा अधिकार कायदा, आरोग्य, शिक्षण तसेच



लोकपाल व लोकायुक्त कायद्याबाबत देशभरातील कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यात येणार असल्याचे लोक आंदोलन न्यासाचे विश्‍वस्त दत्ता आवारी यांनी सांगितले.

मागील काही वर्षांपासून ही संस्था राष्ट्रीय पातळीवर काम करत आहे. आजतागायत दिल्ली, राजस्थान, उत्तराखंड, पंजाब, उत्तरप्रदेश, हरीयाना, कर्नाटक, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश आदी राज्यांमध्ये संघटना बांधणीचे काम सुरू आहे.


उर्वरीत पान ३ वर


# विजय औटींना जामीन मंजूर

## अ‍ॅड. राहुल झावरे मारहाण प्रकरण

नगर : प्रतिनिधी

**पारनेर नगरपंचायतचे माजी नगराध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक विजय सदाशिव औटी यांना जिल्हा सत्र न्यायालयाने सोमवारी जामिन मंजूर केला.**



यासंदर्भातील हकीकत अशी की, फिर्यादी अ‍ॅड.राहुल बबन झावरे यांच्या वनकुटे गावातील ग्रामस्थांनी लोकसभा निवडणुकीच्या मतदानाच्या दिवशी आरोपी माजी नगराध्यक्ष विजय सदाशिव औटी यास गावातून हाकलून देऊन अपमान केलेल्या कारणावरून दि. ६ जून रोजी रोजी पारनेर शहरात गैर कायद्याची मंडळी जमवून राहुल झावरे यांच्यावर प्राणघातक हल्ला व जीवे मारण्याचा प्रयत्न केला होता. या गुन्ह्यात विजय सदाशिव औटी सह २५ जणांवर भारतीय दंड संहिता कलम ३०७ ३२४ ३२३ ३४१ ४२७ १४३ ४१७ १४८ १४८५०४५०६ आर्म अ‍ॅक्ट ३/२५ ४/२५ सह महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३५ अन्वये पारनेर पोलीस स्टेशन मध्ये गु.नं. ४१४/२०२४ प्रमाणे दाखल झालेला आहे.. सदर गुन्ह्यात विजय औटी, नंदकुमार औटी, प्रीतेश पानमंद, मंगेश कावरे यांना सदर गुन्ह्यात दि. ७ जून रोजी अटक करण्यात आली होती.

आरोपी विजय सदाशिव औटी यांनी मा. जिल्हा सत्र नायाधीश अहमदनगर यांच्याकडे अ‍ॅड.अविनाश गंगाधर लांडे उर्वरीत पान ३ वर

## वेळ संघर्षाची होती पण...!

वेळ संघर्षाची होती, पण साथ होती आपल्या माणसांची....! कट रचला होता मला गुंतवण्याचा तो यशस्वी ही झाला, १११ दिवस कारागृहात कैद झालो, आयुष्यात खूप संघर्ष करत आलोय, खूप अडचणी आल्या त्यावर मात करण्याची ताकद आई तुळजाभवानीने दिली आहे. जेवढा संघर्ष केलाय यश त्याच्या दुप्पट नक्कीच असणार, मला गुंतवण्यासाठी खोटे कलम टाकून मला कारागृहात टाकले. जो पर्यत चारित्राची बदनामी होत नाही तो पर्यत इतिहास घडत नाही, तुमच्या सगळ्यांच्या आशीवाद आणि साथ या पुढेही देखील माझ्यासोबत असेल अशी अपेक्षा करतो...! आज मला जामीन मंजूर झाला त्याबद्दल माझ्या सर्व वकील, माझे सहकारी यांचा मी आयुष्यभर ऋणी राहील.

विजय सदाशिव औटी
मा.नगराध्यक्ष नगरपंचायत, पारनेर

# जलील यांची तिरंगा रॅली मुंबईकडे

■ हजारो गाड्यांचा ताफा ■ नितेश राणेंवर कारवाईची मागणी

शिर्डी :प्रतिनिधी

विविध मागण्यांसाठी एमआयएमचे प्रदेशाध्यक्ष, माजी खासदार इम्तियाज जलील यांच्या नेतृत्वात आज सोमवारी छत्रपती संभाजीनगर ते मुंबई तिरंगा रॅली काढण्यात आली. यामध्ये हजारोंच्या संख्येने मुस्लिम बांधव सामील झाले. जलील यांच्या ताफ्यात हजारो गाड्या सामील झाल्याने आणि हा ताफा समृद्धी महामार्गावरून मुंबईकडे निघाल्याने वाहतुकीची कोंडी झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. यावेळी पत्रकाराने जलील यांना प्रश्न विचारला की रस्त्यावर पोलिसांनी तुम्हाला अडवलं का? या प्रश्नाला उत्तर देताना जलील यांनी पत्रकारांना प्रतीप्रश्न करत ''आप मुझे पहचानते नही शायद'' असे म्हणत मला कोणीही थांबविण्याची हिंमत केली नाही असा संदेशच दिलाय.

यावेळी इम्तियाज जलील म्हणाले, सध्या मी पाहतोय की मुस्लिम आणि इस्लाम धर्म आणि आम्हाला आमच्या जीवापेक्षा जास्त प्रिय असलेले मोहम्मद पैगंबर साहेब यांच्या बाबतीत जे काही वक्तव्य केले जात आहे. त्या गोष्टींना आमचा विरोध असून कुणीही अन्य कुठल्याही धर्माच्या बाबतीत चुकीचे विधान करू नये. आम्हाला असं वाटतं की असा एखादा कायदा राज्यात व्हावा ज्यामुळे इतर धर्मांच्या बाबतीत चुकीचं वक्तव्य करणाऱ्यांना त्याची शिक्षा मिळाली पाहिजे. रामगिरी


उर्वरीत पान ३ वर






# तंत्रमंत्र

विज्ञानयुगातील बितंबातम्या

## Quick Share!

## ना ॲपची, ना इंटरनेटची गरज

एखादी महत्त्वाची फाइल, कार्यक्रमातील कॅमेरात काढलेले फोटो, जास्त एमबीचे व्हिडीओ कसे शेअर करायचे असा प्रश्न अनेकांना पडतो. स्मार्टफोनमध्ये फाइल्स शेअर करण्यासाठी ब्ल्यूटूथ हा पर्याय असतो, पण ब्ल्यूटूथवरून फाइल्स शेअर करणे कठीण जाते आणि मोठ्या फाइल्स शेअर होण्यास अधिक वेळही लागतो; तर आता तुम्हाला चिंता करण्याची गरज नाही. कारण क्विक शेअरच्या मदतीने तुम्ही सहज फाइल्स शेअर करू शकणार आहात.



वर्षाच्या सुरुवातीला, गूगलने आपल्या 'निअर बाय शेअर' (Nearby Share) फीचरचे नाव बदलून 'क्विक शेअर' (Quick Share) केलं आहे. हे फीचर विंडोज, क्रोमओएस आणि ॲण्ड्रॉइड उपकरणांवर उपलब्ध आहे. हे फीचर वापरकर्त्यांना फोन, डेस्कटॉप, टॅबलेटमधून फोटो, व्हिडीओ, फाइल्स झटपट शेअर करण्यात मदत करते. तसेच खास गोष्ट अशी की, हे फीचर इंटरनेटशिवाय कार्य करते; त्यामुळे मोबाइल डेटा संपेल याचीसुद्धा वापरकर्त्यांना काळजी करण्याची गरज नाही...

### क्विक शेअर कसे वापरायचे...


क्विक शेअर वापरून फाइल्स पाठवण्यासाठी तुम्हाला जो फोटो, फाइल किंवा लिंक इतरांना पाठवायची आहे ती ओपन करा, त्यानंतर शेअर बटणावर क्लिक करा. आता 'क्विक शेअर' या पर्यायावर टॅप करा, तेव्हा तुम्हाला जवळपासच्या डिव्हाइजची यादी दिसेल. जर तुम्हाला जवळपासच्या पर्यायांची यादी दिसत नसेल तर उजवीकडे असणाऱ्या तीन-डॉट मेनूवर टॅप करा आणि 'सेटिंग्ज'वर क्लिक करा. आता, 'Who can share with you'वर टॅप करा आणि 'व्हिजीबल निअर बाय डिव्हाइज' पर्याय चालू (ऑन) करा. यानंतर आपला फोन जवळच्या डिव्हाइसचा शोध सुरू करेल. तुम्हाला कोणत्या डिव्हाइसवर तुमचे फोटो, व्हिडीओ, फाइल शेअर करायचे आहेत, त्या नावावर क्लिक करा. त्यानंतर फोटो, व्हिडीओ प्राप्तकर्त्याला त्यांच्या डिव्हाइसवर फाइल प्राप्त करण्याची एक सूचना दिली जाईल आणि काही वेळातच फाइल ट्रान्सफर होईल. तर अशाप्रकारे तुम्ही काही मिनिटांत इतरांच्या डिव्हाइसवर फाईल्स ट्रान्सफर करू शकता.

## Google Maps चे १० सिक्रेट फीचर्स...




**जगभरातील लोक अनोळखी ठिकाणी पहिल्यांदा प्रवास करताना गूगल मॅप्सचा उपयोग करतात. या ॲपच्या मदतीने ठरावीक ठिकाणे, कमी ट्रॅफिक असणारा रस्ता, आजूबाजूचा परिसर यांची माहिती मिळते. त्यामुळे या ॲपचा आता जगभरात वापर होऊ लागला आहे. पण, याच गूगल मॅपमध्ये अशी बरीच फीचर्स आहेत, जी खूप कामाला तर येतीलच; शिवाय तुमचा युजर एक्स्पिरियन्स आणखी भारी होईल. चला तर याबद्दल सविस्तर जाणून घेऊ...**

- जेमिनी एआय गूगल मॅप्सवर संवाद साधू शकते : गूगल मॅप्स नुकतेच जेमिनीद्वारे जनरेटिव्ह एआय क्षमतेने सुपरचार्ज झाले आहे; जिथे तुम्ही आता फक्त व्हॉइस कमांड वापरून विशिष्ट स्थानावर नेव्हिगेशन सुरू करू शकता. बाईक चालविताना तुम्ही या फीचरचा उपयोग करू शकता.
- इलेक्ट्रिक वाहन सेटिंग्ज : EV वाहन वापरकर्त्यांना चार्जिंग स्टेशन शोधणे सोपे जाईल. फक्त Google Maps वर तुमचा चार्जर टाईप निवडा आणि electric vehicle charging stations near me म्हणजेच माझ्याजवळील इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग स्टेशन शोधा यावर क्लिक करा. तुम्हाला गूगल मॅप्स इलेक्ट्रिक वाहनाशी सुसंगत असलेली जवळपासची चार्जिंग स्टेशन्स हायलाइट करून दाखवेल. मग ते दोन, तीन किंवा अगदी चारचाकी वाहन असो.
- गूगल मॅप्ससह तुम्ही 'Travel back in time' हे प्रवास फीचर वापरून काही वर्षांपूर्वी एखादे ठिकाण किंवा स्थान कसे दिसायचे ते पाहू शकता. लक्षात ठेवा की, हे फीचर केवळ निवडक ठिकाणे आणि स्थानांसाठी उपलब्ध आहे.
- मित्र आणि कुटुंबासह लाइव्ह लोकेशन शेअर करा : गूगल मॅप्स वापरून, तुम्ही तुमचे लाइव्ह लोकेशन मित्र आणि कुटुंबातील सदस्यांबरोबर शेअर करू शकता. नवीन ठिकाणी प्रवास करताना तुम्ही या फीचरचा वापर करू शकता आणि इतरांची मदत घेऊ शकता. तुम्ही विशिष्ट कालावधीसाठी किंवा प्रवास संपेपर्यंतही लाइव्ह लोकेशन शेअर करू शकता. जर लाइव्ह लोकेशन शेअर करणे थांबवायचे असेल, तर तुम्हाला ते मॅन्युअली बंद करावे लागेल. लक्षात घ्या की, हे फीचर तुमच्या स्मार्टफोनच्या बॅटरीवर परिणाम करील.
- वाहन पार्किंगचे ठिकाण सेव्ह करा : बऱ्याच शहरांमध्ये पार्किंगची ठिकाणे शोधणे कठीण जाते. त्यामुळे आपण आपली गाडी कुठे पार्क केली आहे हे लक्षात ठेवणे कठीण जाते. तुम्ही 'सेव्ह युवर व्हेईकल पार्किंग' हे



फीचर वापरून तुमच्या वाहनाचे अचूक GPS स्थान चिन्हांकित करू शकता; ज्यामुळे तुम्ही परत आल्यावर कार- बाईक कुठे पार्क केली आहे हे शोधणे सोपे जाईल.
- हवामानाची माहिती मिळवा : तुम्ही ज्या ठिकाणी प्रवास करणार असाल, त्या ठिकाणची रीअल-टाइम हवामानाची थेट माहिती गूगल मॅप तुम्हाला देईल. त्यामुळे अनोख्या ठिकाणी प्रवास करण्यापूर्वी त्या ठिकाणच्या हवामानाचा अंदाज घेता येईल.
- इनडोअर लाइव्ह व्ह्यू : विमानतळ किंवा मोठ्या मॉलमध्ये अनेकदा एकमेकांना शोधण्यात वेळ निघून जातो. कारण येथे नागरिकांची रहदारी मोठ्या प्रमाणात असते. इनडोअर लाइव्ह व्ह्यू या फीचरच्या मदतीने विमानतळ किंवा मॉलमधील विशिष्ट स्टोअर किंवा तुमचे बोर्डिंग गेट सहज शोधू शकता. ही बाब लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की, सध्या हे फीचर सध्या फक्त १० हजार ठिकाणांपुरते मर्यादित आहे.
- ऑफलाइन मॅप डाउनलोड करा : प्रवास करताना एक मोठी भीती असते ती म्हणजे कधी नेटवर्क गेले तर; ज्याशिवाय नेव्हिगेशन ॲप बंद होऊ शकते. त्यामुळे प्रवास सुरू करण्यापूर्वी तुम्ही जात असलेल्या ठिकाणचा ऑफलाइन नकाशा डाउनलोड करणे केव्हाही फायदेशीर ठरते. वापरकर्त्यांना गूगल मॅप्सवर विशिष्ट शहरांचे नकाशे डाउनलोड करण्याची सुविधाही मिळते.
- ऑफिस आणि घराचा पत्ता सेव्ह करून ठेवा : ऑफिसला पोहोचायला उशीर झाला असेल, तर कॅब बुक करताना घाई-गडबडीत पत्ता चुकीचा टाकला जाऊ शकतो. त्यामुळे गूगल मॅप्समध्ये घर आणि ऑफिसचा पत्ता सेव्ह करून ठेवा. म्हणजे तुम्ही घराबाहेर पडल्यावर एखादी कॅब बुक करायची असेल, तर तुम्हाला एका क्लिकवर लवकर पोहोचण्याचा जलद मार्ग गूगल मॅप्स दाखवेल.
- एआयसह नवीन ठिकाणे शोधा : सध्या निवडक वापरकर्त्यांसाठी उपलब्ध एआय फीचर गूगल मॅप्सवर नवीन ठिकाणे शोधण्यास मदत करील. तुम्ही पार्टीला जाण्यासाठी नवीन ठिकाणे, किराणा माल खरेदी करण्यासाठी नवीन ठिकाणे गूगल मॅप्सवर शोधू शकता आणि सर्वोत्तम उपलब्ध पर्याय निवडण्यात तुम्हाला एआय मदत करील.

## नाव घ्या, कॉल लागेल...

**काम पटकन व्हावं असं कोणाला वाटत नाही? अशावेळी स्मार्टफोनमध्ये शॉर्टकट्सची मदत घेतली जाते. अनेक लोक असे असतात जे यासाठी शॉर्टकट ॲपचा वापर करता. शॉर्टकट ॲप्समध्ये व्हॉइस डायलिंगसारख्या फीचर्सचा समावेश असतो. त्यामुळे कोणताही फोन नंबर शोधावा लागत नाही. तुम्ही बोलून तो नंबर सहज डायल करू शकता आणि कमांड देऊन त्यावर कॉल करू शकता. यासाठी तुम्हाला फोनला हात लावण्याची देखील गरज नाही. परंतु असे ॲप तुमच्या प्रायव्हसी आणि फोनसाठी सुरक्षित आहेत का? हा एक मोठा प्रश्न आहे, याचा मात्र अनेकजण विचार करत नाहीत आणि जेव्हा पर्सनल डेटा चोरी होतो, तेव्हा डोक्याला हात लावतात. त्यामुळे असे ॲप इंस्टॉल करण्यापूर्वी हजार वेळा विचार केला पाहिजे.**

गुगल प्ले स्टोर आणि ॲप्पल ॲप स्टोरवर अनेक असे ॲप्स उपलब्ध आहेत ज्यांचा वापर केल्याने तुमचं काम पटकन होईल आणि वेळ वाचेल. परंतु हे ॲप तुमच्या संपूर्ण कॉन्टॅक्ट लिस्टसह गॅलरीचा देखील ॲक्सेस मिळवतात. म्हणजे तुमच्या पर्सनल फोटोसह कॉन्टॅक्ट लिस्ट देखील थर्ड पार्टी ॲपच्या हाती जाते. यांचा थेट परिणाम प्रायव्हसीवर होतो. फक्त काही मिनिटे वाचवण्यासाठी तुम्ही तुमची प्रायव्हसी थर्ड पार्टी ॲपच्या हाती गमावता, त्यामुळे डेटा चोरीची शक्यता वाढते. जर तुम्हाला फोन आवाजाने कंट्रोल करायचा असेल तर अँड्रॉइड आणि ॲप्पल डिव्हाइसमध्ये मिळणाऱ्या गुगल असिस्टंट आणि सीरी फीचर्सचा वापर करता येईल. या फीचर्सच्या माध्यमातून तुमचा डेटा लीक होण्याची शक्यता नाही आणि आणि तुम्ही सुरक्षित राहता. अँड्रॉइडवर सर्वप्रथम आपल्या स्मार्टफोनचं पावर बटन प्रेस करा. Google Assistant पावर बटननं ओपन होतं. त्यानंतर स्क्रीनवर Google Assistant दिसू लागेल, आता तुम्ही गुगल असिस्टंटला गुगल हाक मारूनदेखील कमांड देऊ शकता. गुगल तुमची रिक्वेस्ट पूर्ण करेल.

### असं करा इनेबल

जर पावर बटननं असिस्टंट ॲक्टिव्हेट झाला नाही तर फोनमध्ये गुगल ॲप ओपन करा, उजवीकडे तुमच्या प्रोफाईलवर क्लिक करा. त्यानंतर सेटिंग ओपन करा. इथे गुगल असिस्टंटच्या ऑप्शनवर क्लिक करा. त्यानंतर Hey Google आणि Voice Match वर क्लिक करा. त्यानंतर व्हॉइस सिलेक्ट करा आणि इनेबल करा.



### आयफोन युजर्स

आयफोन युजर्स आयफोनमध्ये सीरी फीचर इनबेल करू शकतात आणि आयफोनला स्पर्श न करताच व्हॉइसना कंट्रोल करू शकतात. विशेष म्हणजे ऑथेंटिक ॲप्स व्यतिरिक्त इटकर कोणतेही ॲप वापरणे टाळावे आणि वापरावे लागलेच तर एकदा गुगलवर त्या ॲप्सचे रिव्ह्यू आणि रेटिंग चेक करावे.

## जुना रेफ्रिजरेटर नीट काम करेना?



**उन्हाळ्याने आपले उग्र रूप दाखवायला सुरुवात केली आहे. अशा परिस्थितीत तुमच्या जुन्या रेफ्रिजरेटरने कूलिंग कमी करण्यास सुरुवात केली आहे. याची अनेक कारणे असू शकतात, सामान्यतः असे दिसून येते की फ्रिजमध्ये कूलिंग कमी होण्याचे कारण तांत्रिक नसून सामान्य सवयींमुळे आहे, चला तर मग जाणून घेऊया घरच्या घरी फ्रीजची कूलिंग कशी वाढवता येईल?**

- फ्रीजमधील वस्तूंकडे द्या लक्ष : बरेचदा लोक कमी कॅपिसिटीचा फ्रीज विकत घेतात कारण तो स्वस्त असतो आणि मग त्यात सामान भरून टाकतात. अशा स्थितीत फ्रीजमधील हवेचा प्रवाह योग्य प्रकारे होत नाही. त्यामुळे फ्रीजमध्ये थंडावा कमी होतो. तांत्रिकदृष्ट्या, कोणतेही रेफ्रिजरेटर थंड ठेवण्यासाठी हवेचा प्रवाह आवश्यक असतो. शिवाय, तुमच्याकडे भरपूर सामान असेल तर मोठ्या आकाराचा फ्रीज घ्या, असा सल्लाही दिला आहे.
- तापमानाकडे लक्ष द्या : बरेचदा लोक थंड वातावरणात रेफ्रिजरेटरचे तापमान कमी करतात आणि उन्हाळ्यात तापमान वाढवायला मात्र विसरतात. ज्यामुळे कूलिंगची समस्या उद्भवते. या सामान्य सवयी बदलून कूलिंग वाढवता येते. जर आपण भारताबद्दल बोललो तर



रेफ्रिजरेटरचे तापमान उन्हाळ्यात 35-38°F च्या दरम्यान ठेवावे.
- वॉल्व सील तपासा : फ्रीजच्या दारावर रबर असते, जे फ्रीजमधील हवा बाहेर पडू देत नाही. त्यामुळे फ्रीज थंड राहतो, पण जुन्या फ्रीजमध्ये रबर खराब होण्याची समस्या असते. अशा परिस्थितीत, दरवाजा सील तपासा.
- कंडेनसर कॉइल साफ करणे : कंडेन्सर कॉइल म्हणजे रेफ्रिजरेटरच्या मागे जाळीची जाळी आहे. या जाळीमध्ये धूळ आणि कचरा अडकू शकतो. ज्यामुळे रेफ्रिजरेटर थंड करणे कठीण होते. ही कॉइल वर्षातून एकदा तरी ब्रशने स्वच्छ करा.
- मागील फॅन व्हेंट : रेफ्रिजरेटरच्या मागील बाजूस एक छोटा पंखा बसवला आहे, जो गरम हवा बाहेर टाकतो. अशा स्थितीत मागचा पंखा नीट काम करत आहे की नाही हे नेहमी तपासा. पंखा काम करत नसल्यास, फॅन दुरुस्त करण्यासाठी टेक्निशीयनना कॉल करा.

## एसी देईना थंडावा?

**काही वेळा अनेक सर्व्हिसिंग करूनही, एअर कंडिशनर त्याला कूलिंग मिळणे कठीण होते. जेव्हा असे होते तेव्हा युजर्स खूप अस्वस्थ होतात. जर तुम्हाला तुमच्या एअर कंडिशनरमध्ये अशी कोणतीही समस्या येत असेल, तर काही टिप्स फॉलो करून तुम्ही एअर कंडिशनरची कूलिंग वाढवू शकता...**

सर्वप्रथम, तुम्ही तुमचे एअर कंडिशनर कधीही कमीत कमी तापमानात चालवू नये. जर तुम्ही असे केले तर एअर कंडिशनरचे कूलिंग धोक्यात येते आणि काही महिने चालवल्यानंतर, एअर कंडिशनर योग्यरित्या कूलिंग करणे थांबवू शकते. सीझन संपल्यानंतर जेव्हा तुम्ही एअर कंडिशनर वापरणे बंद कराल. तेव्हा तुम्ही एअर कंडिशनरवर एक कव्हर ठेवावे. खरेतर यामुळे एअर कंडिशनरमध्ये कोणत्याही प्रकारची घाण जाण्यापासून प्रतिबंध होतो आणि पुढील हंगामात त्याची गारवा देण्याची क्षमता देखील कायम राहते. केवळ एअर कंडिशनर खरेदी करून काम होत नाही, तर चांगल्या परफॉर्मन्ससाठी ते तुम्हाला ते वेळेवर सर्व्हिसिंग करून घेणे देखील आवश्यक आहे आणि जर तुम्ही असे केले नाही तर एअर कंडिशनरच्या आत घाण साचू लागते आणि त्यामुळे कूलिंग प्रभावित होते आणि एअर कंडिशनर खराब होते. जर तुम्हाला एअर कंडिशनरच्या महत्त्वाच्या भागांबद्दल माहिती असेल तर तुम्ही ते घरीही सर्व्हिसिंग करू शकता. यामध्ये तुम्हाला मोठी रक्कम खर्च करावी लागणार नाही आणि इतर कोणतेही काम करावे लागणार नाही. जर तुम्ही एअर कंडिशनर चालू असताना त्यावर कोणत्याही प्रकारचे कव्हर ठेवले तर तुम्ही तसे करू नये. कारण त्याचा एअर कंडिशनरच्या कूलिंगवर परिणाम होतो.



### ...तर कमी येईल लाईटबील

- उन्हाळा म्हटलं कि एसीचा वापर वाढून जातो. एसीच्या या वाढत्या वापराबरोबरच सुरू होते वीज बिलाची समस्या मग वाढत्या उकाड्या बरोबरच वाढते वीज बिलही हैराण करू लागते. अशा वेळी काही टिप्स फॉलो केल्यास आपण आपले लाईट बिल कमी करू शकतो.
- करा योग्य एसीची निवड : जर तुम्ही नवीन एसी घेत असाल तर तो तुमच्या रूमच्या साईजनुसार अनुकुल आहे याची खात्री करा.
- कुठला एसी निवडावा : साधारणपणे १००० स्क्वेअर फीट एरिया साठी १ टन, १५०० एरियासाठी १.५ टन तर त्याच्यावरती २टन एसीची निवड करावी.
- सर्व्हिसिंग करणे : उन्हाळा सुरू होण्याआधीच एसीची सर्व्हिसिंग करून घ्यावी. कारण आधीचा पूर्ण सीझन एसी बंद असल्याने त्याच्यात कचरा साचतो.
- फिल्टर साफ करणे : एसीचे फिल्टर वेळोवेळी साफ केल्याने एसी अधिक कार्यक्षम राहते. तसेच वेळोवेळी गरजेनुसार फिल्टर बदलून घ्यावे.

## किती जीबी रॅमचा फोन घ्यावा?

**स्मार्टफोन खरेदीवेळी रॅमची निवड एक मोठा आणि महत्वाचा प्रश्न अनेकांना सतावतो. यामुळे अनेकांचा गोंधळ उडतो की त्यांच्यासाठी किती जीबी रॅम असलेला स्मार्टफोन बेस्ट आहे. या प्रश्नाला ठराविक असं उत्तर देणं तसं कठीण काम आहे. कारण प्रत्येकाची गरज वेगळी असते. त्यानुसार रॅमची आवश्यकता बदलते. तुम्ही स्मार्टफोन किती आणि कशासाठी वापरता यावर या प्रश्नाचे उत्तर अवलंबून असते.**

- जर तुम्ही फोन अत्यंत बेसिक कामांसाठी म्हणजे कॉल, मेसेज, वेब ब्राउजिंग, सोशल मीडियासाठी वापरण्यासाठी करत असाल तर तुमच्यासाठी ४ जीबी रॅम असलेला फोन बेस्ट ठरेल. जर तुम्ही फोनमध्ये गेमिंग, व्हिडीओ एडिटिंग असं मल्टीटास्किंग करत असाल तुमच्यासाठी ६ जीबी ते ८ जीबी रॅम असलेला स्मार्टफोन योग्य ठरेल. जर तुम्ही हेव्ही गेमिंगसाठी फोन वापरत असाल तसेच ४ के व्हिडीओ एडिटिंग करत असाल तर तुमच्यासाठी १२ जीबी रॅम असलेला फोन हवाच.
- प्रोसेसर किती हवे? : कोणत्याही फोनच्या स्पीडसाठी प्रोसेसर देखील तितकाच महत्वाचा आहे. म्हणून चांगला प्रोसेसर कमी रॅमसह देखील चांगला स्पीड देतो. जर फोनचा प्रोसेसर जुना असेल तर सोबत जास्त रॅम आवश्यक आहे. जर तुम्ही फोन दीर्घकाळ वापरणार असाल तर तुमच्यासाठी ६ जीबी रॅम बेस्ट ठरेल.
- जास्त रॅममुळे फोनचे नुकसान : विशेष म्हणजे जितका जास्त रॅम तितकची फोनची किंमत वाढते. तसेच जास्त जीबी रॅम असलेल्या फोनची बॅटरी लवकर डिस्चार्ज होते. फोनची देखील यात महत्वाची भूमिका आहे. त्यामुळे युजर्सना जास्त जीबी स्टोरेज असलेला स्मार्टफोन खरेदी केला पाहिजे.
- वर्चुअल रॅम म्हणजे काय? : वर्चुअल रॅम म्हणजे फोनला जेव्हा हवं तेव्हा अतिरिक्त रॅमची ताकद देणं. परंतु यासाठी फिजिकली रॅम जोडला जात नाही तर इंटर्नल स्टोरेजचा वापर केला जातो. याला वेगवेगळ्या कंपन्यांनी वेगवेगळी नावं दिली आहेत. उदाहरणार्त सॅमसंग 'रॅम प्लस', रियलमी 'डायनॅमिक रॅम' आणि विवो 'वर्चुअल रॅम' म्हणते.

## शॉर्ट न्यूज

### शासनाच्या कौशल्य विकास केंद्राचे उद्घाटन

**अकोले :** तालुका एज्युकेशन सोसायटीचे कॉलेज ऑफ मॅनेजमेंट आणि अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय अकोले यांच्या संयुक्त विद्यमाने राज्य सरकारच्या कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राचा शुभारंभ दुरदृश्यप्रणालीद्वारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाला. यावेळी केंद्रीय मंत्री, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

### कैद्यांच्या राड्यात पोलिसाला झाली मारहाण

**कोपरगाव :** येथील दुय्यम कारागृह येथे असलेल्या कैद्यांमध्ये आपापसात राडा चालू असून स. फौजदार सोडवण्यासाठी गेले असता त्यांना देखील लाथा बुक्क्यांनी मारहाण करुन जीवे मारण्याची धमकी दिल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी कोपरगांव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान या घटनेमुळे कारागृहात खळबळ उडाली आहे. किरण अर्जुन आजवे व मयूर उर्फ भुऱ्या अनिल गायकवाड असे आरोपीचे नाव असून, सध्या दोन्ही आरोपी हे कोपरगाव दुय्यम कारागृहात कैदी आहे.

### धनगर समाज आक्रमक ; अडवला महामार्ग

**नेवासा :** धनगर समाजाचा अनुसूचित जमातीत समावेश केला जावा या मागणीसाठी नेवासा फाटा येथे सुरू असलेल्या आमरण उपोषणाची सरकारने दखल न घेतल्याने शनिवारी धनगर समाज आक्रमक झाला होता. नेवासा तालुक्यात संभाजीनगर अहमदनगर महामार्गावर शेळ्यामेंढ्यासह उतरत धनगर समाजाने रास्तारोको आंदोलन केलेय. महामार्गावर वाहनांच्या लांबच्या लांब रांगा लागल्या होत्या. रस्तारोको आंदोलनाचे नेतृत्व धनगर समाज आरक्षण कृती समितीचे अशोकराव कोळेकर यांनी नेतृत्व केले. मंडलधिकारी सरिता मुंडे, पोलीस निरीक्षक धनंजय जाधव यांनी निवेदन स्वीकारले.

### शेवगाव तहसीलमध्ये शेतकऱ्यांचा ठिय्या

**शेवगाव :** तालुक्यातील शिवपाणंद सते व शेतरस्ते खुले करा, या मागणीसाठी शेवगाव तालुका कृति- समितीच्या वतीन शेतकऱ्यांनी रॅली काढून शेतीला रस्ता मिळालाच पाहिजे, जय जवान, जय किसान भारत माता की जय इनक्लाब जिंदाबादच्या घोषणा देत रॅली शेवगाव तहसील कार्यालयात पोहोचली. त्यानंतर तीन तास ठिय्या आंदोलन करण्यात आले. शेवगावचे तहसीलदार प्रांत सांगडे यांनी शिवपाणंद रस्ते व शेत रस्ते समितीचे प्रमुख शरदराव पवळे यांच्या उपस्थितीत तालुक्यातील शेतकऱ्यांशी संवाद साधत लगेच परिपत्रक परिपत्रक काढून शेवगाव कृती समितीला दिले.

### बिबट्याच्या झुंजीमध्ये एकीचा मृत्यू

**संगमनेर :** तालुक्यातील शिबलापूर येथील म्हस्के वस्तीवर शुक्रवारी रात्री साडेसातच्या सुमारास मांजराच्या शिकारीवरून दोन बिबट्या मादीमध्ये तासभर झालेल्या झुंजीमध्ये अखेर एका मादीचा अंत झाला आहे. याबाबतची अधिक माहिती अशी, की सावळेराम शिवराम म्हस्के यांच्या घराजवळून मांजराची शिकार करून एक वर्षाची बिबट मादी कपाशी शेतात गेली. त्याचवेळी दुसऱ्या बिबट मादीने हल्ला चढविला. एक तास चाललेल्या हल्ल्यात एकवर्षीय मादीच्या नरड्याला जबर मार लागल्याने करुण अंत झाला.

# रांजणगावच्या महागणपतीला सोन्याच्या मोदकाचा नैवेद्य !

### सुवर्णकाठाच्या गुलाबी वस्त्रासह सुवर्णालंकारांचा साज | गणेशोत्सवानंतरची भाद्रपद महिन्यातील संकष्टी चतुर्थी

**शिरूर : प्रतिनिधी**

**रांजणगांवला संकष्टी चतुर्थीनिमित्त देवस्थानचे मुख्य विश्वस्त डॉ. ओमकार देव यांच्या हस्ते गणपतीची महापुजा करण्यात आली. त्यानंतर महागणपतीला सुवर्णकाठाच्या गुलाबी वस्त्रासह सुवर्णालंकारांचा साज चढविण्यात आला आणि सोन्याच्या मोदकाचा नैवेद्य दाखविण्यात आला.**

संकष्ट चतुर्थीनिमित्त रांजणगाव गणपती (ता. शिरूर) येथे सकाळपासूनच भाविकांची गर्दी होती. महागणपतीला अभिषेक घालून महानैवेद्य दाखविण्यात आला. संकष्ट



चतुर्थीनिमित्त रांजणगावच्या गणपती मंदिरात प्रसन्न वातावरण होते. त्यात भजनी मंडळाच्या गणेश स्तुतीपर स्तवनांनी मंदिर परिसरात आणखी प्रसन्नता भरली होती.

गणेशोत्सवानंतरची ही भाद्रपद महिन्यातील संकष्टी चतुर्थी असल्याने भाविकांची दिवसभर वर्दळ सुरु होती. पहाटे विधीवत पूजा व महाभिषेकानंतर मंदिर दर्शनासाठी खुले करण्यात आले. सकाळी मंदिर प्रांगणात सामुहिक अथर्वशीर्ष पठणाचा सोहळा झाला. यात स्थानिक भाविकांनी सहभाग घेतला. श्री क्षेत्र रांजणगाव गणपती देवस्थान ट्रस्टच्या अध्यक्षा स्वाती पाचुंदकर, मुख्य विश्वस्त डॉ. ओमकार देव, उपाध्यक्ष संदीप दौंडकर, सचिव डॉ. तुषार पाचुंदकर, खजिनदार विजय देव, उद्योजक दत्तात्रेय पाचुंदकर आदींसह देवस्थानचे पुजारी, कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

मुख्य गाभाऱ्यात प्रगतशील शेतकरी नानासाहेब दिनकरराव पाचुंदकर यांच्या वतीने फुलांची सजावट केली होती. दुपारी बारा वाजता डॉ. देव यांच्या हस्ते महापुजेनंतर महागणपतीला सुवर्णकाठाच्या गुलाबी वस्त्रासह सुवर्णालंकारांचा साज चढविण्यात आला. सोन्याच्या मोदकाचा नैवेद्य दाखविण्यात आला. भाविकांना दर्शन घेताना कुठलीही अडचण येऊ नये यासाठी देवस्थान ट्रस्टच्या वतीने काटेकोर नियोजन करण्यात आले होते.

# निळवंडेच्या पाण्याचा शेतीक्षेत्राला मोठा लाभ होईल- डॉ. सुजय विखे पाटील

**संगमनेर : प्रतिनिधी**

**निळवंडे कालव्यांचे पाणी आल्याने अनेक वर्षांचे स्वप्न पूर्ण होत आहे. पालक मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या सुयोग्य नियोजनामुळे पाण्याचा थेट लाभ शेतीक्षेत्राला होणार असल्याने गावाचे अर्थकारण प्रगतीच्या दिशेने जाईल, असा विश्वास डॉ. सुजय विखे पाटील यांनी व्यक्त केला.**

तालुक्यातील निमगावजाळी आणि आश्वी येथे निळवंडे उजव्या कालव्यातून उपलब्ध झालेल्या पाण्यामुळे गावातील बंधारे व तलाव भरल्याने परीसरातील शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. यानिमित्त आयोजित जलपूजन कार्यक्रमात डॉ. विखे बोलत होते.

मागील अनेक वर्षांपासून निळवंडे धरणाच्या पाण्याची प्रतिक्षा या भागातील शेतकऱ्यांना होती. राज्यात महायुतीचे सरकार



आल्यानंतर मंत्री विखे पाटील यांच्या पुढाकाराने कालव्यांची कामे मार्गी लागली. २०२४ पर्यंत पाणी देण्याचा दिलेला शब्द पूर्ण होत असल्याचे समाधान सर्वांना आहे, असे डॉ. विखे म्हणाले.

कालव्याच्या पाण्याचा लाभ थेट शेतीक्षेत्राला होणार असल्याने उत्पादकता वाढण्यास मोठी मदत होईल. गावाचे अर्थकारण यामुळे बदलेल, असा विश्वास व्यक्त करताना त्यांनी मंत्री विखे पाटील यांच्या माध्यमातून प्रत्येक गावात विकासाची प्रक्रिया सुरू असल्याचे सांगितले. विकास कामांचा चढता आलेख शिर्डी मतदारसंघात कायम असून, रस्त्यांच्या कामांसह व्यक्तिगत लाभाच्या योजनांना लोकांपर्यंत पोहचविण्यात जनसेवा फाउंडेशनच्या माध्यमातून पुढाकार घेतला जात आहे. राज्यातील महायुती सरकारने सुरू केलेल्या सर्व योजनांची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेबरोबरच बचत गटातील महिलांच्या उत्कर्षासाठी विखे पाटील यांच्या पुढाकाराने योजना राबविल्या जात आहेत. शिर्डी येथे सुरू होणाऱ्या औद्योगिक वसाहतीमुळे युवकांच्या रोजगाराचा प्रश्न मार्गी लागेल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

## काव्यरंग

### ‘ते’



ते वागतात ती निति
ते सांगतील तो धर्म
त्यानी केले ते कर्म
तेच जाणतात वर्म

ते करतात ते पुण्य
ते म्हणतील ते पाप
ते म्हणतील तेच खरे
ते म्हणतील तो बाप

त्याना नको ते नाही
ते सांगतील ते सर्व
ते बोलतील ते सत्त्य
ते म्हणतील ती पूर्व

ते इतिहासाचे कर्ते
ते काळाच्याही पुढले
इतरांच्या उद्धारास्तव
ते आभाळातून पडले

**साहेबराव ठाणगे**

# विद्याधाम प्रशालेचे तीन खेळाडू विभागीय पातळीवर

### जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेत दमदार कामगिरी

**शिरूर : प्रतिनिधी**

**जिल्हास्तरीय झालेल्या मैदानी स्पर्धेत विद्याधाम प्रशाला शिरूरचे खेळाडूंनी यशस्वी कामगिरी करत विभागीय पातळीवर त्यांची निवड झाली आहे.**




त्यामध्ये ओपन साईड ऐअर राईफल १७ वर्षे वयोगटात रूद्र तानाजी वाळके याची विभागीय पातळीवर निवड झाली. तसेच कॅरम या स्पर्धेत शेख आयेषा परवेज १७ वर्षे वयोगटात आणि शेख मोहम्मद इसामजहर १४ वर्षे वयोगटात विभागीय पातळीवर निवड झाली.या यशस्वी विद्यार्थ्यांना क्रिडा विभाग प्रमुख सचिन रासकर, क्रिडा स्पर्धा प्रमुख भास्कर करंजुले, संदीप तानवडे, संतोषकुमार देंडगे,शरद दरवडे, पूनम पवार यांनी मार्गदर्शन केले.

या सर्व यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष अनिल बोरा, सचिव नंदकुमार निकम, शालेय समितीचे अध्यक्ष धरमचंद फुलफगर तसेच प्रशालेचे प्राचार्य गुरूदत्त पाचर्णे, पर्यवेक्षक दिगंबर नाईक, मच्छिंद्र बनकर, चंद्रकांत देविकर यांनी अभिनंदन केले.

(पान १ वरून)

### राळेगणसिध्दीत दोन दिवशीय राष्ट्रीय शिबिर

दिल्ली येथे आजपर्यंत विविध शिबिरे पार पडली असल्याचे संस्थेचे उपाध्यक्ष निवृत्त आयएएस अधिकारी डॉ. कमल टावरी यांनी सांगितले.

या शिबिरादरम्यान दि.२८ सप्टेंबर रोजी सायंकाळी सात वाजता ह.भ.प. अशोक महाराज इलग शास्त्री बोधेगांवकर यांची किर्तनसेवा राळेगणसिध्दीतील ट्रेनिंग सेंटर येथे होणार असल्याची माहिती न्यासाचे विश्वस्त दगडू मापारी व लक्ष्मण मापारी यांनी दिली.

### विजय औटींना जामीन मंजूर

यांच्यामार्फत नियमित जामीन मिळण्यासाठी अर्ज केला होता. त्या अर्जावर दोन्ही पक्षाचे युक्तिवाद झाले. त्यानंतर आरोपी विजय सदाशिव औटी यांच्या वकिलाचा युक्तिवाद ग्राह्य धरून सोमवारी न्यायालयाने जामीन मंजूर केला.

### जलील यांची तिरंगा रॅली मुंबईकडे

महाराज आणि राणेच्या मुलाला शिक्षा झाली पाहिजे. या राज्यामध्ये कायदा आणि कानून आहे असा संदेश गेला पाहिजे असे म्हणत जलील यांनी नितेश राणे आणि रामगिरी महाराजांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

जलील यांनी हार तुरे नाकारले

मोहम्मद पैगंबर साहेबांच्या बाबतीत वादग्रस्त आणि चुकीचे विधान करणाऱ्यांवर कारवाई व्हावी यासाठी हजारो लोकांसोबत मुंबईकडे निघालेले इम्तियाज जलील यांनी कार्यकर्त्यांनी शाल आणि पुष्पगुच्छ हार आणले असता ते सगळे नाकारले आहे. आम्ही न्याय मागण्यासाठी सरकार दरबारी जात आहोत. राजकारण करण्यासाठी नाही. त्यामुळे मी कोणतेही स्वागत सत्कार घेणार नाही अशी भूमिका जलील यांनी घेतली.

समृद्धी महामार्गावर वाहतुकीची कोंडी

इम्तियाज जलील यांची तिरंगा रॅली आज सकाळी समृद्धी महामार्गावरून मुंबईकडे निघाली आहे. हजारोंच्या संख्येने वाहने समृद्धी महामार्गावर चढल्याने मोठ्या प्रमाणात वाहतुकीची कोंडी झाली. जागोजागी एमआयएम पक्षाचे कार्यकर्ते आणि मुस्लिम बांधव या तिरंगा रॅलीला जोडले जात असल्याने एक मोठा ताफा समृद्धी महामार्ग दिसून आल्याने वाहनांच्या लांबच लांब रांगा दिसल्या. तर काही वाहने विरुद्ध दिशेने जात असल्याने पोलिसांनी त्यांना शिस्त लावली.

वाचकांच्या लेखणीतून

# बेदर्दी, तू क्या जाने प्रीत?

बेदर्दी, तू क्या जाने प्रीत?
झूटी दिखाई रीत ।।धृ।।
प्रेम डगर जो सब कुछ हारे
होगी उसी की जीत ।।१।।

मी १९७१ ते १९७५ या काळात आमच्या निघोज गावी श्रीमुलिकादेवी माध्यमिक विद्यालयात शिकत होतो. गावातल्या घरात मी आणि माझी आजी राहत असू. आमच्या एकत्र कुटुंबातील बाकी सदस्य मळ्यात वस्ती करून असत.



आमच्या शेजारी भाड्याच्या घरात अंबादास अनंत पायमोडे नावाचे गृहस्थ आपल्या पत्नीसह राहत असत. नवविवाहित जोडपे होते. ते मूळचे टाकळी ढोकेश्वर (ता. पारनेर, जि. अहमदनगर) इथले. त्यामुळे घरात दोघांशिवाय अन्य कुणीच नव्हते. हे गृहस्थ आमच्या माध्यमिक विद्यालयात क्लार्क होते. अक्षर नेकळे आणि वळणदार. आम्ही त्यांना सर या नावानेच संबोधीत असू. मध्यम उंची. सावळा वर्ण. ओठांवर मध्यम आकाराच्या झुकत्या मिशा, अंगात पांढरी बंडी, पांढरा पायजमा, पायात चामड्याच्या चकचकीत चपला. स्वभावाने मितभाषी. तोंडात कुणाचीच निंदा केल्याचे आठवत नाही. तोंडी अभद्र शब्द नव्हते. एकदम शालीन गृहस्थ. पत्नी बोलकी आणि मनमिळाऊ स्वभावाची.

या सरांच्या घरात रेडिओ होता. फावल्या वेळात मी सरांच्या घरात रेडिओ ऐकत बसे. त्यावेळी मोबाईल किंवा दूरदर्शन नव्हते. त्यामुळे प्रबोधन आणि मनोरंजनाचे रेडिओ हे मोठे साधन होते. विविध वक्त्यांची भाषणे, बिना की गीतमाला, अन्य मराठी-हिंदी चित्रपटगीते, भजने, ठुमरी, चैती, कजरी, दादरा, क्वचित शास्त्रीय गायन, लोकसंगीत (भेदिक गायन, लोकनाट्य वा वगनाट्य) अशा विविध कार्यक्रमांचा लाभ मला तेथे मिळत असे. त्यांचा रेडिओ मी स्वत: बिनदिक्कतपणे हाताळीत असे.

सकाळच्या आठ वाजता आकाशवाणीवर बड़े गुलाम अली ख़ान, शोभा गुर्टू, निर्मलादेवी, परवीन सुलताना यांच्या हिंदी ठुमऱ्या ऐकायला मिळत. ठुमरी हा गायनप्रकार मला खूप आवडत असे (आजही आवडतो). विशेषत: निर्मलादेवींचे ठुमरी गायन मला फारच आवडत असे.

ठुमरी हा उपशास्त्रीय गायन प्रकार आहे. शास्त्रीय राग आणि लोकसंगीत यांचे योग्य मिश्रण म्हणजे ठुमरी. ठुमकणे या क्रियापदापासून ठुमरी हा शब्द आला. ठुमरीचे दोन प्रकार आहेत. पूर्वी अंगाची ठुमरी आणि पश्चिमी अंगाची ठुमरी. बनारस, लखनऊ या प्रदेशांत गायली जाणारी ती पूर्वी ठुमरी. पंजाब प्रदेशात गायली जाणारी ती पश्चिमी अंगाची ठुमरी. निर्मलादेवी पंजाबी अंगाची ठुमरी गात. त्यांचा कंठ मधुर वाटे. त्यांच्या आवाजातली फिरकत तर विशेष आवडे. ठुमरीत साधारणपणे एक स्थायी आणि एक अंतरा असे. निर्मलादेवींनी गायलेल्या ठुमरीच्या वरील बोलांवरून हे लक्षात येईलच.

का करूं सजनी आये न बालम, आ जा बालम परदेसी अशा सुंदर सुंदर ठुमऱ्या त्या काळात मी ऐकत असे. पुढे निर्मलादेवींच्या अनेक सुंदर सुंदर ठुमऱ्या ऐकल्या. मैंने लाखों के बोल सहे, रो रो नैन गंवायें, मोरी बाली उमर बीती जाये.....

पायमोडे सर आता या जगात नाहीत. पण साहित्य, संस्कृती, कला यांबाबत त्यांनी माझ्यावर केलेले संस्कार मला पुढे फार उपयोगी पडले. त्याबद्दल पुढे लिहिणारच आहे.

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
निघोज, ता. पारनेर,जि. अहमदनगर.






# शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी कटिबद्ध

**। सुजित झावरे पाटील यांची ग्वाही**
**। वासुंदे येथे वैयक्तिक लाभाचे साहित्य वाटप**



**वासुंदे : प्रतिनिधी**

**राज्य शासन व केंद्र शासन यांच्या माध्यमातून सर्वसामान्य व्यक्तीला केंद्रबिंदू मानून अनेक वैयक्तिक लाभाच्या योजना सुरू आहेत या योजना सर्वसामान्य शेतकरी ग्रामस्थ व महिला युवक युवती यांच्यापर्यंत पोहोचविण्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करून कटिबद्ध असल्याचे मत जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांनी व्यक्त केले.**

वासुंदे येथे वैयक्तिक लाभाचे साहित्य वाटप करण्यात आले यावेळी झावरे बोलत होते ते पुढे म्हणाले पारनेर तालुक्यातील अनेक गावांमध्ये वैयक्तिक लाभाच्या योजना पोहोचविल्या आहेत ग्रामीण भागामध्ये शासकीय योजनांची माहिती वेळेवर पोहोचत नाही त्यामुळे शासकीय योजनांची माहिती सांगून ती योजना सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठीच आम्ही काम करत आहोत.

वासुंदे येथील बांधकाम कामगार मजुर यांना महाराष्ट्र राज्य बांधकाम कामगार कल्याणकारी योजना यांच्या मार्फत गावातील २३१ कुटुंबीयांना कामगार, मजुर यांना घरगुती भांडी (१०,०००/- रू किंमतीचे) साहित्य वाटप सुजित झावरे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

### शासकीय योजनांचा लाभ देणार

**सुजित झावरे पाटील यांच्या माध्यमातून पारनेर तालुक्यात व वासुंदे गावात अनेक शासकीय योजना राबविल्या जात आहेत. बांधकाम कामगार कल्याणकारी योजनेचा वैयक्तिक लाभ सर्वसामान्य मजूर कामगारांपर्यंत पोहोचविला जात आहे. त्या माध्यमातून गावातील अनेक लोकांना लाभ होत आहे. यापुढील काळातही सुजित झावरे यांच्या माध्यमातून सर्वसामान्य व्यक्तीला पाठपुरावा करून शासकीय योजनांचा लाभ मिळवून देणार आहे.**

**विमल झावरे**
**(सरपंच, वासुंदे)**

यावेळी सरपंच विमलताई झावरे, उपसरपंच शंकर बर्वे, चेअरमन नारायण झावरे, रणजीत काका पाटील, व्हा चेअरमन रामचंद झावरे, भाऊसाहेब सैद, दिलीप पाटोळे, स्वप्निल झावरे, पोपटराव झावरे, लहानभाऊ झावरे, लक्ष्मण झावरे, बाळासाहेब झावरे, रामदास झावरे, मारूती औटी, बाळासाहेब पानसरे, बाळशिराम सैद, बाळासाहेब वाबळे, अर्चना दाते, सोनाली झावरे, शालन साळुंके, मनीषा रोहकले, प्रियांका बा. गांगड, अरुणा चिकणे, सायली झावरे, अवंतिका हिंगडे, सुनिता खराबी, रेखा हिंगडे, मंगल हिंगडे, नशिरा शेख मुन्नाबाई जगदाळे आदी महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

# मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचा कारभार सेवाभावी

**जिल्हा बँक संचालक प्रशांत गायकवाड**

**निघोज : प्रतिनिधी**

**स्व. बाबासाहेब कवाद व त्यांच्या सहकाऱ्यांनी मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टची स्थापना करुण लोकाभिमुख विकासकामे करीत सर्वसामान्य जनतेला आधार मिळेल अशाप्रकारे सेवाभाव केला असून ट्रस्ट पदाधिकारी व विश्वस्त मंडळ यांनी त्यांचे अनुकरण करीत तोच सेवाभाव मोठ्या प्रमाणात सुरू केला असून मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचा नावलौकिक जिल्ह्यात झाला असल्याचे प्रतिपादन जिल्हा सहकारी बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड यांनी व्यक्त केला आहे.**

गायकवाड हे सहकुटुंब राज्याचे जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीच्या दर्शनासाठी निघोज येथे आले होते. यावेळी त्यांनी मळगंगा देवी प्रसादलयासाठी ११ हजार १११ रुपयांची देणगी मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त शंकरराव लामखडे व संतोषशेठ रसाळ यांच्याकडे सुपूर्द केली. यावेळी घोडगंगा सहकारी साखर कारखान्याचे संचालक सोपानराव भाकरे व जी एस महानगर बँकेचे सेवानिवृत्त अधिकारी भगवान पांढरकर यांच्या हस्ते गायकवाड यांचा सत्कार केला.



**■ जिल्हा सहकारी बँकेचे संचालक प्रशांत गायकवाड यांनी अन्नदानासाठी मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टला ११ हजार १११ रुपयांची देणगी दिली आहे. यावेळी त्यांचा सत्कार करण्यात आला.**

यावेळी मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त शंकरराव लामखडे व संतोषशेठ रसाळ यांनी प्रसादालयाची माहिती देताना सांगितले की गेली तीन सप्टेंबर रोजी खासदार नीलेश लंके यांच्या हस्ते या मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट संचालित भोजनालयाचे उद्घाटन करण्यात आले असून भावीक व गावातील गरीब व गरजू यांच्यासाठी फक्त वीस रुपयांत पोटभर जेवणाची व्यवस्था करण्यात आली असून सकाळी बारा ते दुपारी दोन तसेच सायंकाळी सहा ते आठ अशी वेळ ठेवण्यात आली आहे.

दररोज मोठ्या प्रमाणात अन्नदान होत असून आजपर्यंत शेकडो भाविकांनी व ग्रामस्थांनी प्रसादालयातील अन्नदानासाठी देणग्या दिल्या आहेत. यामाध्यमातून शेकडो भाविक व गोरगरीब जनतेला अन्नदान होत असल्याचे पुण्यकर्म घडत असून माता मळगंगा देवीचा आशीर्वाद अन्नदानासाठी देणग्या देणाऱ्या भावीकांना व ग्रामस्थांना मिळत आहे. जनतेने अन्नदानासाठी मोठ्या प्रमाणात सहकार्य करावे असे आवाहन मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट पदाधिकारी, व विश्वस्त मंडळ तसेच सल्लागार मंडळ व सभासद, ग्रामस्थ व मुंबईकर मंडळ यांनी केले आहे.

# हिवरे कोरडाच्या सरपंचपदी मंगल अडसूळ बिनविरोध

**समर्थकांचा गुलाल उधळीत जल्लोष**

**हिवरे कोरडा : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील हिवरे कोरडा ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी मंगल संतोष अडसूळ यांची बिनविरोध निवड करण्यात आली. निवड जाहीर होताच समर्थकांनी फटाके व गुलाल उधळत आपला आनंद साजरा केला.**

हिवरे कोरडा ग्रामपंचायतीच्या सरपंच सपना बबन अडसूळ यांनी आपसात ठरल्याप्रमाणे आपल्या सरपंच पदाचा राजीनामा दिला होता. त्यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या सरपंचपदासाठी मंगळवारी ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच पदासाठी निवडणूक घेण्यात आली.



यावेळी सरपंचपदासाठी मंगल अडसूळ यांचा एकमेव उमेदवारी अर्ज आल्याने निवडणूक निर्णय अधिकारी तथा मंडल अधिकारी उचाळे यांनी मंगल अडसूळ यांची बिनविरोध निवड जाहीर केली. याप्रसंगी सपना अडसूळ , संतोष जऱ्हाड , सुदाम कोरडे, शकील शेख , सुभाष माळी, ज्योती घंगाळे आदी. ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते. नवनियुक्त सरपंच मंगल अडसूळ यांचा संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष राजेश परकाळे, टायगर ग्रुपचे जिल्हाध्यक्ष बंटी भिंगारदिवे, मा. उपसरपंच सबाजीराव जऱ्हाड आदी. मान्यवरांनी सत्कार करून भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

गावकऱ्यांनी आपल्यावर दाखविलेल्या विश्वासाला कधीही तडा जाऊ न देता गावच्या विकासासाठी सदैव प्रयत्न करेन अशी ग्वाही यावेळी नवनिर्वाचित सरपंच मंगल अडसूळ यांनी निवडीनंतर बोलताना दिली.

# माझा वाढता प्रभाव, ही विरोधकांची डोकेदुखी

**विश्वनाथ कोरडे यांचा हल्लाबोल । जामगाव व काळकुप येथील रस्ता कामांचे भूमिपूजन संपन्न**



**जामगाव : प्रतिनिधी**

**गेल्या अनेक वर्षांपासून राजकीय क्षेत्रात वाटचाल करत असताना आलेला प्रशासकीय कामांतील अनुभव व पक्षीय नेतृत्वांच्या सहकार्यामुळे तालुक्यात संघटनात्मक पदाच्या माध्यमातून पारनेर तालुक्यातील राजकीय, सामाजिक क्षेत्रात माझा वाढत असलेला प्रभाव विरोधकांची डोकेदुखी वाढवत असल्याचा हल्लाबोल भाजपाच्या प्रदेश कार्यकारणी सदस्य विश्वनाथ कोरडे यांनी केला.**

जामगाव व काळकूप येथील प्रत्येकी ३० लक्ष अशा एकूण ६० लक्ष रुपये प्रशासकीय किंमत असलेल्या रस्ता कामांच्या उद्घाटन प्रसंगी कोरडे बोलत होते. जामगाव येथील (शिंदे वस्ती) जामगाव ते पाडळी तर्फे कान्हूर तर काळकुप येथील जामगाव ते कदमवस्ती (काळकुप) या रस्ता कामांचे गट ब ३०५४ -२४१९ रस्ते व पूल दुरुस्ती या योजनेंतर्गत मंजूर असलेल्या रस्ता कामांच्या भूमिपूजन समारंभ कोरडे यांच्या हस्ते संपन्न झाला.

जिल्हा परिषदेच्या बांधकाम समितीचे सभापती काशिनाथ दाते, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष सुभाष दुधाडे, तालुकाध्यक्ष राहुल शिंदे, शिवसेना तालुकाध्यक्ष विकास रोहोकले, खरेदी विक्री संघाचे चेअरमन बाबासाहेब खिलारी,मनसेचे तालुकाप्रमुख बाळासाहेब माळी, युवा मोर्चाचे सरचिटणीस सोपान मुंजाळ, जामगावच्या सरपंच पुष्पाताई माळी,काळकुपचे उपसरपंच आनंदा भुजबळ, मा.सरपंच दिनकर सोबले, चेअरमन बाळासाहेब सोबले, ग्रामपंचायत सदस्य आप्पा मेहेर, प्रसाद मेहेर, समीर मांढरे, संजय शिंदे, दगडू खाडे, पांडुरंग हिलाळ, दिपक क्षीरसागर, मनोज शिंदे, जालिंदर खाडे उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना कोरडे म्हणाले की ,राजकीय, सामाजिक क्षेत्रात काम करत असताना आपल्याला मिळालेल्या पदाचा वापर हा जनतेच्या प्रगतीसाठी झाला पाहिजे या विचारांची पाठराखण करणारा मी एक कार्यकर्ता असून आजपर्यंत मिळालेल्या घटनात्मक व संघटनात्मक पदाचा वापर केवळ मिरवण्यासाठी न करता, तालुक्यातील जनतेला न्याय देण्याची भूमिका घेत या तालुक्यातील कृषी, शैक्षणिक, क्रीडा, ग्रामविकास, पर्यटन, तिर्थक्षेत्र व जलसंधारण आदी क्षेत्राला चालना देणारी जी अशक्यप्राय वाटणारी कामे मार्गी लागली व आजही लागताहेत त्याचा राजकीय विरोधकांनी धसका घेतला असून माझ्यापेक्षा अधिकची कामे करण्यापेक्षा मी करत असलेल्या कामात खोडा घालण्यात ते धन्यता मानत असून त्यातून त्यांच्याच मनाचा कोतेपणा जनतेसमोर येत असल्याचेही कोरडे यावेळी म्हटले आहे.

केंद्र सरकार व राज्यसरकारच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्यासह संपूर्ण देशाची सर्वच क्षेत्रांत होत असलेली यशस्वी घोडदौड, सरकारच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेला केंद्रस्थानी ठेवून घेतले गेलेले विविध धोरणात्मक व दिलासादायक निर्णय व सर्वसामान्य नागरिकांच्या चेहऱ्यावर दिसून येणारे समाधान पाहता उद्याच्या काळात महाराष्ट्र राज्यात निश्चितपणे महायुतीचे सरकार सत्तेत येणार असल्याचा आशावादही कोरडे यावेळी व्यक्त केला.

# आयर्न मॅन स्पर्धेत डॉ. जय पोटे जगात २२ वे !

**भारतीयांसाठी अभिमानाची बाब पद्मभूषण अण्णा हजारेंच्या हस्ते सन्मान**



**राळेगण सिद्धी : प्रतिनिधी**

**पद्मभूषण डॉ. अण्णासाहेब हजारे यांच्या विचारांनी प्रेरित डॉ. जय पोटे यांनी अलीकडेच जागतिक पातळीवरील प्रतिष्ठित आयर्न मॅन स्पर्धेत २२ वा क्रमांक मिळवून भारतीयांसाठी अभिमानाची बाब ठरवली आहे. त्यांच्या या यशाचा अनुभव कथन आणि मुलाखतीचा कार्यक्रम डी. बी.एम.इंग्लिश मीडियम स्कूल व श्री संत निळोबाराय विद्यालय, राळेगण सिद्धी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता.**

या कार्यक्रमाचे आयोजन सुनील हजारे, विजय पोटे आणि श्री संत निळोबाराय विद्यालय यांनी केले होते. आयर्न मॅन स्पर्धा ही जगातील सर्वात कठीण स्पर्धांपैकी एक आहे, ज्यामध्ये ३.८ किलोमीटर पोहणे,१८० किलोमीटर सायकलिंग आणि ४२ किलोमीटर धावणे अशा तीन टप्प्यांचा समावेश असतो. डॉ. पोटे यांनी १५ तास ५५ मिनिटांत ही स्पर्धा यशस्वीपणे पूर्ण करून जागतिक स्तरावर २२ वा क्रमांक पटकावला.

कार्यक्रमात डॉ. पोटे यांनी त्यांच्या तयारीचा आणि स्पर्धेतील अनुभवाचा विद्यार्थ्यांसोबत सविस्तर कथन केला. विद्यार्थ्यांनी स्पर्धेबद्दल विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना, त्यांनी मेहनत, चिकाटी आणि ध्येयासक्तीचे महत्त्व पटवून दिले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुभाष पठारे सर यांनी केले. उपस्थित मान्यवरांमध्ये प्राचार्य सोपान घाणे सर, सुनील हजारे, विजय पोटे, डॉ. राम पोटे, तसेच डीबीएम इंग्लिश मीडियम स्कूलचे प्राचार्य जे.डी. मापारी आणि सर्व विद्यार्थी, शिक्षकवर्ग यांचा समावेश होता.

पद्मभूषण डॉ. अण्णासाहेब हजारे यांनी डॉ. जय पोटे यांचे कौतुक करताना सांगितले, 'डॉ. पोटे यांनी मिळवलेले यश हे फक्त त्यांच्यासाठीच नव्हे, तर संपूर्ण समाजासाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या या कामगिरीमुळे पुढील पिढीला योग्य दिशेने मार्गक्रमण करण्यासाठी दिशा मिळेल.'

डॉ. जय पोटे यांच्या यशाबद्दल डीबीएम इंग्लिश मीडियम स्कूलच्या वतीने प्राचार्य जे.डी.मापारी, पद्मभूषण डॉ. अण्णासाहेब हजारे, सरपंच जयसिंग मापारी आणि प्राचार्य सोपान घाणे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांसाठी सुनील हजारे, विजय पोटे आणि मित्र मंडळ यांच्या वतीने खाऊचे वाटप करण्यात आले.

# वाडेगव्हाण ते हिंगणी फाटा रस्ता खुला

**महसूल, भुमी अभिलेख व पोलीसांची संयुक्त कारवाई**



**वाडेगव्हाण : प्रतिनिधी**

**गेल्या अनेक वर्षांपासून अतिक्रमणामुळे बंद झालेला वाडेगव्हाण ते हिंगणी फाटा हा रस्ता महसूल, भुमि अभिलेख व पोलीसांनी संयुक्त कारवाई करीत खुला केला. हा रस्ता खुला करण्यासाठी प्रगतीशिल शेतकरी दिपक खंदारे यांनी पारनेरच्या तहसिलदारांकडे दाद मागितली होती.**

या रस्त्यावर अतिक्रमण करण्यात आल्याने अनेक शेतक-यांची कुचंबना होत होती. शेतमालाची वाहतूकही करता येत नव्हती. या रस्त्यावर शेतकरी दिपक खंदारे यांची पाच एकर शेतजमीन असून रस्ता बंद असल्याने ही शेती पडीक होती. शेतामधील डाळींब, पेरू ही फळबाग तसेच शेडनेट हाउस, शेत तलाव सोडून देण्याची वेळ खंदारे यांच्यावर आली होती. खंदारे यांची आर्थिक तसेच मानसिक हानी होत असल्याने त्यांनी अतिक्रमणधारकांकडे आर्जव करूनही दाद मिळाली नाही.

**गेल्या अनेक वर्षांपासून हा रस्ता अतिक्रमणांच्या विळख्यात होता. तहसिलदारांकडे दाद मागितल्यानंतर अनेक वर्षानंतर हा रस्ता खुला झाला. महसूल, भुमी अभिलेख तसेच पोलीसांनी या कामी केलेल्या सहकार्याबद्दल आभार. अजूनही काही रस्ते अतिक्रमणांमुळे बंद आहेत, ते खुले करण्यासाठी लढा दिला जाईल.**

**दिपक प्रभाकर खंदारे**
**राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त शेतकरी**

सन २०२१ मध्ये खंदारे यांनी तत्कालीन तहसिलदार ज्योती देवरे दावा दाखल केला होता. देवरे यांच्यानंतर चार वर्षात अनेक तहसिदारांच्या बदल्या झाल्याने या दाव्याच्या निकालास विलंब होत होता. अखेर गायत्री सैंदाणे यांनी आदेश देत हा रस्ता खुला करून देण्याचे आदेश दिले होते.

तहसिलदार सैंदाणे यांच्या आदेशानंतर वाडेगव्हाणचे मंडलाधिकारी एम.बी. गायकवाड, पारनरेचे मंडलाधिकारी इरप्पा काळे, जवळयाचे मंडलाधिकारी जयसिंग मापारी, वाडेगव्हाणचे तलाठी अशोक लांडे, यांनी भुमी अभिलेख विभागाचे अधिकारी तसेच सुपा पोलीस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांच्या मदतीने या रस्त्यावरील अतिक्रमणे हटवून रस्ता खुला करून दिला.

# एसटी बस मोटारसायकलच्या अपघातात एकाचा मृत्यू

**नगर - पुणे महामार्गावरील घटना**

**सुपा : प्रतिनिधी**

**नगर - पुणे महामार्गावर वाघुंडे बु।। शिवारात शनिवारी दुपारी एसटी बस व मोटारसायकल यांचा भीषण अपघात होऊन मोटारसायकलस्वराचा यात मृत्यू झाला आहे.**



याबाबत सुपा पोलिसांनी सांगितले कि, शनिवारी दुपारी शिरूर आगाराची नगर पुणे एस टी बस क्रमांक एम एच -१४ बीटी ४१४३ ही अहमदनगर हून पुण्याच्या दिशेने जात होती त्याच वेळी मयत राहुल पांडुरंग गांगर्डे ( वय २५ ) रा. मांदळी ता. कर्जत हे शाईन मोटारसायकल क्रमांक एम एच-१६ डीएच ८७५६ हे दुचाकीवरुन पुण्याच्या दिशेने जात होते. अहमदनगर पुणे महामार्गावरील वाघुंडे बुद्रुक शिवारात हॉटेल इन्सपायर जवळ दुचाकी व एस टी बस यांचे जोराची धडक होऊन झालेल्या अपघातात दुचाकीचालक गंभीर जखमी झाला.

घटनेची माहिती मिळताच सुपा पोलिस स्टेशनचे पोलिस निरिक्षक अरुण आव्हाड तात्काळ सहकार्यासह घटना स्थळी दाखल झाले त्यांनी जखमी दुचाकी चालकास रुग्णालयात दाखल केले असता तेथे त्यास मृत घोषित केले. सुपा पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करत प्राथमिक माहितीनुसार आकस्मिक मृत्यू ची नोंद केली व मृतदेहाचे शवविच्छेदन पुर्ण करण्यासाठी पारनेर ग्रामीण रुग्णालयात दाखल केला. सुपा पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक अरुण आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली पो खैरे पुढील तपास करत आहेत.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com